**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,**
१७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/पुवि/२०१८-१९/४९५० दिनांक- 11 JUN 2019

**प्रति,**

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पुणे

**विषय-** राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इ. ८ वी चा वर्ग सन २०१९-२० या वर्षा पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ-** शासन निर्णय क्र. प्रशाव-२०१९/प्र.क्र. ३०/एसएम-५, दि. २८.०२.२०१९

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास पुणे जिल्हयातील शाळेला खालील अटींच्या व शर्तीच्या अधिन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे.

| शासन यादी क्र. | शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | वर्ग | मंजूर वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कुल, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१९-२० |

**अटी व शर्ती :-**

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार भौतिक सोयी सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
२. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
३. सदर वर्गास विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. पुणे यांनी करावी.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास, संचालनालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

MRaut
(मिनाक्षी राऊत)
प्र शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.१.

**प्रत :**
मुख्याध्यापक, सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कुल, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे



Scanned with OKEN Scanner

**कायम विनाअनुदान तत्वावर**
(माध्यम इंग्रजी)

जाक्र. प्राशि-२/खाप्राशा/मा.इंग्रजी/२०१४/७७३८/३८
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 17 JAN 2015

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद पुणे

विषयः प्रथम मान्यता मिळणेबाबत
कै.पै. विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान संचलित, सहयाद्री इंग्लिश मिडीयम, स्कुल तळेगांव दाभाडे ता. मावळ जि. पुणे

संदर्भः १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र.माशानु २००७/(१००१/०७)/ माशि १. दिनांक १९ ऑक्टोबर २००७.
२. शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे पत्र जा.क्र.शिउसं/प्राशि-३/नखाप्राशा/पुवि/०९/ २९००८२/१२ दिनांक ०२/१२/२००९
३. शिक्षणाधिकारी (प्राथ) पुणे यांचे पत्र शिक्षण/खाप्राशा/९१४/१२ दि.१२/०६/१३
४. या कार्यालयाचे पत्र दिनांक १८.१०.२०१३
५. शिक्षणाधिकारी (प्राथ) पुणे यांचे पत्र शिक्षण/खाप्राशा/०५/१५ दि.१६/०१/१५.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला संदर्भ क्र-२ अन्वये तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमासाठी सन २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापी संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु न करता सदरची शाळा सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. २ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२०१० पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १. | कै.पै. विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान तळेगांव दाभाडे , ता.मावळ जि. पुणे | सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कुल, तळेगांव दाभाडे ता. मावळ जि. पुणे | १ ली | इंग्रजी | जून २०१० पासून |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणसंकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादींमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिका-यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्याआदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/३५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्रधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तदनंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक-शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

(राजेंद्र गोधने)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

३.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४.अध्यक्ष/सचिव,

कै.पै. विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान मावळ जि. पुणे

२००८/९२ (४७)

तात्काळ

कायम विनाअनुदान (इंग्रजी माध्यम)

जा.क्र.शिउसं/प्राशि-३/नइंप्राशा/पुवि-०९

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 2 DEC 2009

प्रति,

प्रशासन अधिकारी,
नगरपालिका शिक्षण मंडळ, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे.

विषय : २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत . .

संदर्भ : १.शासन पत्र क्रमांक नप्राशा-१००८/प्र.क्र.६७८/प्राशि३दि.१८.८.२००९
२.मा.प्र.शिक्षण सहसंचालक (प्राथ.),प्राथमिक शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे, यांचे पत्र क्र.नप्राशा/२००८-०९/इंग्रजी/मान्यता/ड ५१२(ब)/३७२८ दि.८/१०/२००९.

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००९ - २००१० या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | कै.पै. विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि. पुणे. | श्री. डोळसनाथ विद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि. पुणे. | पहिली | इंग्रजी |

## कायम विनाअनुदानीत

त्यामूळे या संस्थेकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमून्यातील स्वयंस्पष्ट शिफारशीसह आपला अहवाल १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यांत येत आहे..

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना शाळा परवानगी देणे/ न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यांत येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी..
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक / माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमून्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच आपला अभिप्राय सादर करावा.व त्याआधारेच शाळेची परवानगी दिली जाईल.
११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधित संस्था उघडणार नाही. असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यांत आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखिल संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३ शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००३/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ मधील तरतूदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली सदर शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगीचे आदेश रद्द झाले आहेत.असे गृहीत धरले जाईल.सदर शाळा १८ महिन्याच्या आत संस्था सुरु करणार असल्यास तसा संस्थेचा ठराव सादर करण्यात यावा. सदर शाळा २००९-१० मध्ये सुरु केलेली

१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.

१५ संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यांत यावी. (उदा:- नांव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

१६ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.
३. शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India ) अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर, २००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

(कु.हाडे सु. जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१.करिता

स्थळप्रतीवर मा. शि. उ. स. यांची सही असे.

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

प्रत : १.मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.
२.मा. शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

प्रत : अध्यक्ष/सचिव
के.पै. विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि. पुणे.

प्रत : शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,पुणे.

कायम विनाअनुदान तत्त्वावर
(मराठी,इंग्रजी, हिंदी, उर्दू , तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/५५८/२०१७
पुणे १ दिनांकः-१४/०६/२०१७

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कुल,
तळेगांव दाभाडे ता.मावळ जि.पुणे

विषयः- विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता २ री ते इ.७ वीचा वर्ग जोडण्यास मान्यता परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. प्राशापु-११११२/(२५८/२०१३)/प्राशि ३ मंत्रालय मुंबई दि. २/०७/२०१३.
२) शालेय शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशाधो-२०१४/(१८१/२०१४) एमएम-५ दि. २४/०३/२०१५.
३) शासन निर्णय क्र.प्रशातु-२०१५/प्र.क्र.४४/१५/एसएम-५ दि. १० मार्च २०१६.
४) मा. शिक्षण उपसंचालक, शिक्षण संचालयनालय पुणे विभाग पुणे यांचेकडील मान्यता आदेश जा.क्र. शिउसं/प्राथ-३/नखाप्राशा/पुवि-०९/२९००८/१२ दि. २/१२/२००९

संदर्भ क्र. १ अन्वये खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या इयत्ता २ री ते इ.७ वीचा वर्ग जोडण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कुल, तळेगांव दाभाडे ता.मावळ जि.पुणे | इंग्रजी | इयत्ता २ री ते ७ वीच्या वर्गास मंजूर | विना अनुदान तत्वावर मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेला वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
२. या आदेशान्वये ज्या शाळांना वर्ग मंजूर करण्यात आलेले आहे त्या शाळांची पटसंख्या विहीत निकषांप्रमाणे असल्यांची खात्री संबंधित गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती पुरंदर यांनी करावी.
३. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९अन्वये शाळांनी भौतिक सोयीसुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
४. या आदेशान्वये मान्यता प्राप्त खाजगी कायम विनाअनुदानित शाळांमधील इयत्ता २ री व इयत्ता ७ वीचा अतिरिक्त वर्गांना शासन मान्यता दिल्यामुळे अनुदानाचा कोणताही हक्क प्राप्त होत नाही. या वर्गांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.
५. तसेच संदर्भाधिन क्र. (५) येथील दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये नैसर्गिक वाढ बंद करण्यात आलेली असल्याने इयत्ता ८ वी नंतर प्रस्तुत शाळांना नैसर्गिक वाढ लागू राहणार नाही.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

प्रत :- माहितीसाठी रवाना
१.सचिव/अध्यक्ष :- सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कुल, तळेगांव दाभाडे ता.मावळ जि.पुणे
२. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती मावळ जिल्हा परिषद पुणे

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्राशा/स्वयंअशाळा/811/२०१९
पुणे- १ दिनांक : 11/०६/२०१९

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
कै.पै.विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठाण संचलित सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कूल, तळेगाव दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे

विषय : सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमयमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्यावाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६ व २४) २०१३

२.शासन निर्णय क्र.प्राशाव-2019/प्र.क्र.30/एसएम-5 दिनांक-28.2.2019

३.शिक्षण उपसंचालक, पुणे जा.क्र.शिऊसं/प्राथ-202/पुवि/2018-19/4150 दि.11.6.2019

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ च्या निर्णयानुसार खालील अटी व शर्तीवर विद्यमान प्राथमिक शाळेस प्राथमिक इ.८ वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा / दर्जावाढ | मान्यता वर्ग व इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | कै.पै.विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठाण तळेगाव दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे | सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कूल, तळेगाव दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे | इंग्रजी | दर्जावाढ स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | प्राथमिक शाळा इ.८ वी | २०१९-२० |

## अटी व शर्ती

१. संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२. शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३. या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

४. संदर्भ क्रमांक .०२ अन्वये सन २०१९-२० मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरू न केल्यास सदर परवानगी रद्दवातल ठरेल.

५. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपद्धतीचे तसेच वालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

६. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

७. शासन निर्णय **प्राशाव-2019/प्र.क्र.30/एसएम-5 दिनांक-28.2.2019** तील अटी शर्तीतील मददा क्र.२ चे कायम पूर्त तेच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

**८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.**

**९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१३ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.**

१०.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलवजावणी करणे वंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

परवानगी वर्ष :-२०१९-२०२०
माध्यम : इंग्रजी
स्वंयअर्थ सहाय्यित शाळा
(माध्यमिक)

जा.क.शिउसं/माध्य-३०२/प्र.मा.दर्जावाढ/पुवि/२०१९ /६६४४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 17 SEP 2019

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**विषय : सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ साठी जून-२०१९ पासून इ. ९ वी व इ. १० वी इंग्रजी माध्यम चे वर्गास प्रथम मान्यता देण्याबाबत.**
**कै. पै. विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठाण, तळेगांव दाभाडे ता. मावळ जि. पुणे संचलित सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कूल, तळेगांव दाभाडे ता. मावळ जि. पुणे**

संदर्भ :- १) शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्रमांक नाहप्र-२००९/(६६३/०९) माशि-१, दिनांक २०.६.२०१२
२) शालेय शिक्षण विभाग,मुंबई कडील शासान निर्णय एसएफएस-१०१९/प्र.क्र. ५८४/एसएम-२, दिनांक ५.८.२०१९
३) शालेय शिक्षण विभाग,मुंबई कडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक एसएफएस-१०१९/प्र.क्र. ५८४/एसएम-२, दिनांक १६.८.२०१९
४) या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं /माध्य-३०३/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/६२४७, दिनांक २६.८.२०१९
५) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य/सांक्र/२०१९/४२०७ दिनांक ३.९.२०१९

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **कै. पै. विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठाण, तळेगांव दाभाडे ता. मावळ जि. पुणे संचलित सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कूल, तळेगांव दाभाडे ता. मावळ जि. पुणे** या इंग्रजी माध्यम माध्यमिक शाळेस संदर्भीय क्र. २ चे शासन निर्णयानुसार स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून राज्यमंडळ दर्जावाढ सर्व शाखा उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ . ६ वी ते १२ वी चे वर्ग इंग्रजी माध्यम करिता देण्यात आलेली होती. तदनंतर संदर्भ क्रमांक ३ चे शासन शुध्दीपत्रकान्वये उच्च प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक ते उच्च माध्यमिक इ. ९ वी ते १२ वी सर्व शाखा राज्यमंडळ इंग्रजी माध्यम असे वाचावे असे नमूद केलेले आहे. तदनंतर या कार्यालयाने संदर्भीय पत्र क्रमांक ४ अन्वये इ. ९ वी ते १२ वी इंग्रजी माध्यम राज्यमंडळ करिता सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळेस परवानगी दिलेली आहे.

आता आपल्या संदर्भीय क्रमांक ५ व्दारे आपण दिलेली स्वयंस्पष्ट शिफारस विचारात घेता **इ. ९ वी इ. १० वी चे वर्गास सन २०१९-२०२० पासून इंग्रजी माध्यम राज्यमंडळ दर्जावाढ शाळा सर्व शाखा स्वयंअर्थसहाय्यित तत्वाकरिता प्रथम मान्यता** देण्यात येत आहे.

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२.नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

४.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

५.संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

६.शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

७.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

१०.संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

१२.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१९-२०२०** पासून असेल

१३.शैक्षणिक वर्ष **२०१९-२०२० मध्ये** ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य - अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी माध्यम नवीन माध्यमिक शाळा / वर्ग असे** दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

१६.महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७.महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U-Dise** मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी

१.शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येंवू नयेत.

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

६. **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष,शर्ती,अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

७. **महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम २००९ व नियम २०१६ चे पालन करणे बंधनकारक आहे.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी शिक्षणधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

(प्रविण अहिरे )
प्र.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१.

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

**१. मुख्याध्यापक, सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कूल, तळेगांव दाभाडे ता. मावळ जि. पुणे**

२. विभागीय सचिव,पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

३. अध्यक्ष/सचिव, **कै. पै. विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठाण, तळेगांव दाभाडे ता. मावळ जि. पुणे संचलित**

४. निवडनस्ती कार्यासन माध्य-३०२

तात्काळ
कालमर्यादित

जा.क्र. शिउसं/माध्य-३०३/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/ 8280
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : 26 AUG 2019

प्रति,
कै.पै.विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान, तळेगाव दाभाडे,
ता.मावळ, जि.पुणे संचलित सहयाद्री इंग्लिश स्कूल,
तळेगांव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे

विषय : सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत

संदर्भ : १. महाराष्ट स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२ (सन २०१३ चा ०१)
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं. **एसएफएस-१०१९/प्र.क्रं.५८१/एसएम-२ दिनांक ०५ ऑगस्ट, २०१९**
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन शुध्दीपत्रक **एसएफएस-१०१९/प्र.क्रं.५८१/एसएम-२ दिनांक १६ ऑगस्ट, २०१९**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीय शासन पत्र क्रं. २ व ३ अन्वये महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) **कै.पै.विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान, तळेगावं दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे संचलित सहयाद्री इंग्लिश स्कूल, तळेगांव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे या शाळेस (इ.९वी ते १२ वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) सन २०१९-२० या शैक्षणिक** वर्षापासून दर्जावाढ करण्यास शासन परवानगी देण्यात आली आहे.

**अटी व शर्ती :-**

१) **सदर संस्थेने अतिरिक्त रुपये १५,०००/- इतक्या रकमेचे चलन, अद्ययावत बँक बॅलन्स प्रमाणपत्राची प्रत, लगतच्या तीन वर्षांचे लेखा परिक्षण अहवालाच्या प्रती, इयत्ता इ. १ ली ते ८ वी चे अद्ययावत आरटीई नमुना-२ प्रमाणपत्राची प्रत, या कार्यालयाकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत पुर्तता न केल्यास शाळेची मान्यता आपोआप रद्य समजण्यात येईल.**

२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे. :-

अ. व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या** आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब. व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तत करुन या संदर्भीय शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा **महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल

४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस **१)** शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीने तसेच, **२)** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तत झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम,** शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

७) युडायस डाटा :- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा/ दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरतांना, **"स्वंयअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा"** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमां प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबधीत संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता, **"स्वंयअर्थसहाय्यित तत्तवावरील परवानगीप्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

८) परवानगी दिलेल्या स्वंयअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणांप्रमाणे करावी.

MRaut

**(मिनाक्षी राऊत)**
**प्र.शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१.**

**प्रत : माहिति व कार्यवाहीस्तव रवाना**

**१. शिंक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर**

१. मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.

२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे